# उमेदवारांसाठी सुचना

वनरक्षक भरतीप्रक्रिया - २०१६, यवतमाळ वनवृत्त यवतमाळचे अनुषंगाने दिनांक २३.११.२०१६ रोजी टप्पा ३ करीता (शारिरीक पात्रता व दस्त:ऐवज तपासणीकरीता) उमेदवारांची यादी प्रसिध्द केली होती. या प्रकरणी अनेक होतकरू उमेदवारांनी त्यांना १:३ या प्रमाणात कोणत्या संवर्गामध्ये पात्र ठरविले आहे बाबत विचारणा केली होती. तसेच अन्य उमेदवारांनी संवर्ग निहाय १:३ प्रमाणात पात्र ठरविलेल्या उमेदवारांची यादी काय आहे व त्यांची धावण्याची वेळ काय आहे बाबत विचारणा केली होती.

सर्व सामान्यासाठी तसेच या भरती प्रक्रियेसाठी अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांसाठी यापुर्वी ३० मिनिटाचे आत आलेल्या सर्वच उमेदवारांची यादी त्यांनी पळण्याच्या स्पर्धेत नोंदविलेल्या वेळेसह प्रसिध्द करण्यात आली होती.

उमेदवारांची विनंती विचारात घेता आता दिनांक ३०.११.२०१६ व १.१२.२०१६ रोजी शारिरीक मोजमाप तपासणी तसेच शैक्षणीक व ईतर अर्हता संबंधीचे दस्त:ऐवज तपासणीसाठी जी प्राथमीक यादी प्रसिध्द केली होती त्या उमेदवारांची संवर्ग निहाय १:३ प्रमाणात पात्रता कोठे होती हे दर्शविणारी यादी उमेदवारांचे माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे.

प्राथमिक यादीतील जे उमेदवार निर्धारीत वेळेत शारिरीक मोजमाप तपासणीसाठी हजर राहिले नाहित व जे उमेदवार मोजमाप तपासणीत अपात्र ठरले असे उमेदवार वगळुन भरती करावयांच्या पदाचे अनुषंगाने संवर्गनिहाय १:३ प्रमाणात पात्र ठरलेल्या (३० मिनिटाच्या आत धावण्याची स्पर्धा पुर्ण केलेल्या उमेदवारांपैकी) उमेदवारांची सुधारित यादी आता प्रसिध्द करण्यात येत आहे. सुधारीत यादीतील ज्या उमेदवारांची मोजमाप तपासणी व दस्त:ऐवज तपासणी झालेली नाही अशा उर्वरीत ४६ उमेदवारांची यादी सुध्दा प्रसिध्द करण्यात येत आहे. या यादीतील उमेदवारांनी त्यांचे शारिरीक मोजमाप तपासणे तसेच शैक्षणीक अर्हता संबंधीचे दस्त:ऐवज व आरक्षण इत्यादी बाबतचे प्रमाणपत्र तपासणीसाठी खालील वेळापत्रकानुसार व स्थळावर उपस्थित राहावे.

**दिनांक** :- २२/१२/२०१६

**स्थळ** :- मुख्य वनसंरक्षक,(प्रादेशिक) यवतमाळ यांचे कार्यालय, पळसवाडी कॅम्प,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, दारव्हा रोड, यवतमाळ

**वेळ** :- सकाळी १०.०० ते दुपारी २.०० वाजे पर्यंत

उमेदवारांनी त्यांचे जात प्रवर्गानुसार लागु असलेल्या खालील दस्त:ऐवजांची मुळ प्रत व एक साक्षांकीत प्रत सोबत आणावी. **निर्धारीत वेळेत जे उमेदवार हजर राहणार नाहीत त्यांची शारीरीक पात्रता व दस्तऐवज तपासणी केली जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

| अ.क्र. | आवश्यक दस्त:ऐवज |
|---|---|
| १ | प्रवर्गनिहाय निर्धारीत शैक्षणीक अर्हताबाबत गुणपत्रीका व प्रमाणपत्र |
| २ | अनुसुचित क्षेत्रात अनुसुचित जमातीचे उमेदवारांबाबत अनुसुचित जमातीचे जात प्रमाणपत्रासह जात वैधता प्रमाणपत्र किंवा शासन अधिसुचना दिनांक ९.०६.२०१४ प्रमाणे यवतमाळ जिल्हयातील अनुसुचित क्षेत्रात दिनांक २६.०१.१९५० पासुन स्वत: किंवा त्यांचे आई वडील किंवा आजी आजोबा सातत्याने वास्तव्य करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र |
| ३ | सक्षम प्राधिकरणाकडील अधिवास प्रमाणपत्र |
| ४ | मागासवर्ग उमेदवारांकरीता सक्षम अधिका-यांने जारी केलेले जात प्रमाणपत्र / जात वैधता प्रमाणपत्र |
| ५ | अनुसंचित जाती व अनुसुचित जमाती वगळुन ईतर मागास प्रवर्गातील उमेदवारांना नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत वैध असलेले |
| ६ | वनसेवेत कार्यरत असतांना मृत्यु पावलेल्या वनकर्मचा-यांचा पाल्य असल्याबाबत पुरावा / दस्त:ऐवज |
| ७ | नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मरण पावलेल्या किंवा गंभीररित्या जखमी झालेल्या वनखबरे व वनकर्मचा-यांचे पाल्य असल्याबाबत सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्र |
| ८ | सेवेत कार्यरत असतांना मृत्यु पावलेल्या वनकर्मचा-यांचे पाल्य असल्याबाबत सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्र |
| ९ | युध्द काळात वा युध्द नसतांना सैनिकी सेवेत मृत्यु झालेल्या किंवा अपंगत्व येवुन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीस यापुर्वी शासकीय सेवेत यायोजनेखाली आरक्षीत पदाचा लाभ मिळालेला नसल्याबाबत सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र |
| १० | प्रकल्पग्रस्त किंवा भुकंपग्रस्त असल्याबाबत सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र |
| ११ | वनमजुर असल्याबाबत सक्षम अधिका-यांकडुन प्राप्त प्रमाणपत्र/पुरावा |
| १२ | शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्ष अंशकालीन काम केलेल्या उमेदवारांचे अनुषंगाने सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र |
| १३ | खेळाडु उमेदवारांसाठी विभागीय उपसंचालक यांचेकडुन खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करून क्रिडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडु कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणीत केलेले प्रमाणपत्र |
| १४ | वरील दस्तऐवजा व्यतीरिक्त या दस्त:ऐवजास भरती प्रक्रियाचे अनुषंगाने पर्यायी म्हणुन सक्षम प्राधिकरणाने निर्धारीत केलेले आहेत असे दस्त:ऐवज |

सदस्य सचिव
प्रादेशिक निवड समिती यवतमाळ वनवृत्त
तथा
उपवनसंरक्षक, यवतमाळ वनविभाग